महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

(CIN NO. U40109MH2005SGC153646)

प्रेषक,
अधिक्षक अभियंता
अऊदा संवसु मंडळ, अकोला
विद्युत भवन, ३रा माळा,
रतनलाल प्लॉट, अकोला-४४४००५
फोन नं. ०७२४ – २४३४५४४ / २४३४५४५
ईमेल आयडी - se1200@mahatransco.in

जा. क्र. अअ/अऊदा/संवसु/मंडळ/मासं/ NO - 0028 दिनांक - 08 JAN 2025

# परिपत्रक

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात उत्तीर्ण उमेद्वारांन करिता या कार्यालयाद्वारे वर्ष २०२४-२५ करीता शिकाऊ उमेद्वारांना एक वर्ष कालावधीसाठी कराबध्द करण्यात येणार आहे. त्या करिता www. apprenticeshipindia.gov.in या संकेतस्थळावर पात्र शिकाऊ उमेद्वारी करिता दिनांक १३.१२. २०२४ ते २६.१२.२०२४ च्या रात्री २४.०० पर्यंत आस्थापना नोंदणी क्रमांक E08242700253 वर ऑनलाईन अर्ज सादर करण्याबाबत व ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर या जाहीरातीसह जोडलेला प्रपत्र अ परीपुर्ण भरुन त्यासह ऑनलाईन सादर केलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती व इतर कागदपत्रे दि. ०२.०१.२०२५ सांय. ०६:०० वाजेपर्यंत कार्यालय :- अधिक्षक अभियंता, अउदा संवसु मंडळ, अकोला, ३ रा माळा, रतनलाल प्लॉटस, अकोला-४४४ ००५ या पत्त्यावर पोस्टाने/स्वहस्ते पोहचेल या बेताने पाठविण्याचे जाहिर केले होते.

करिता या कार्यालयात ऑनलाईन प्रणालीद्वारे ८३४ अर्ज या कार्यालयीन संकेतस्थळावर प्राप्त झाले. या कार्यालयाने सदर अर्जांची पडताळणी केली असता अर्जाची प्रत व आवश्यक कागदपत्रे/प्रमणापत्रांच्या छायांकीत प्रती, गुणपत्रीका १० वी व आय.टी.या.आधार कार्ड, प्रत,फोटो जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, व इतर कागदपत्रे काही उमेदवारांनी ऑनलाईन प्रणालीत सादर केलेले नाही. तसेच काही प्रती अस्पष्ट जोडलेले आहे.

या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, ऑनालाईन अर्जात ज्या उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या छायांकीत प्रती व इतर कागदपत्रे सादर न केलेल्या उमेदवारासांठी शेवटची संधी म्हणुन दि.०९.०१.२०२५ ते १३.०१.२०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात सादर करावे. अन्यथा जे उमेदवार ऑफलाईन अर्ज या कार्यालयात सादर करणार नाहीत त्यांचा शिकाऊ उमेदवार प्रक्रीयेसाठी यांचा विचार केला जाणार नाही.

(संजय ओं. कांटकर)
अधिक्षक अभियंता,
अउदा संवसु मंडळ, अकोला.

CamScanner